महाराष्ट्राचा बुलंद आवाज । दैनिक

# मराठवाडा पत्र

बीड । महाराष्ट्र
रविवार दि. १ मार्च २०२६
वर्ष ५ वे । अंक ३२९
पान १ । पाने ४
किंमत ३ रूपये

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955 E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com

RNI/MAHMAR/2021/80074 । Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 । https://marathwadapatra.com । https://epaper.marathwadapatra.com













### ग्रामपंचायत सदस्यांना विचारात न घेणे पडले महागात!

## सरपंचाला जनतेनेच बसवले घरी

**वडवणी । प्रतिनिधी**

**तालुक्यातील लोणवळ-बाबी येथील सरपंच मुक्ताबाई अंकुश राठोड यांच्या गावातील विविध विकास कामांवर भ्रष्टाचाराचा आरोप, ग्रामपंचायत सदस्यांना विचारात न घेणे, ग्रामस्थांची अडवणूक होत असल्याने त्यांच्याविरुध्द जनतेतून अविश्वास ठराव घेण्यासाठी विशेष ग्रामसभेचे आयोजन वडवणी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवार दि. २७ फेबुवारी २०२६ रोजी करण्यात आले होते. यामध्ये ६७४ विरुध्द २९८ मतांनी हा ठराव जनमतातून पारीत झाल्याने जनतेने निवडून दिलेल्या सरपंचाला जनतेनेच घरी बसवल्याची तालुक्यातील काडीवडगांव पाठोपाठ ही दुसरी घटना असल्याने तालुक्यात चर्चेचा विषय होत आहे.**



याबाबत अधिक माहिती अशी की, वडवणी तालुक्यातील लोणवळ बाबी ग्रुप ग्रामपंचायत असलेल्या सरपंच पदासाठी जनतेतून निवडून आलेल्या सरपंच सौ. मुक्ताबाई अंकुश राठोड यांच्या कामामध्ये अनियमितता, गावातील नागरिकांचे वेळेवर काम न करणे, विकास कामांची अडवणूक करणे आदी कारणास्तव गावातील नागरिकांनी व ग्रामपंचायत सदस्यांनी सरपंच अपात्रतेसाठी दि.१३ फेब्रुवारी २०२६ रोजी ८ विरुध्द २ असा ठराव वडवणी पंचायत ▶▶पान २ वर

### सोनाराच्या डोळ्यात चटणी टाकून लुटणारी

## दरोडेखोरांची टोळी जेरबंद

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील होळ ते डिघोळअंबा मार्गावर सोनारास डोळ्यात तिखट चटणी टाकून व चाकूचा धाक दाखवत लुटणाऱ्या सहा जणांच्या टोळीला स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली आहे. दि. २१ फेब्रुवारी २०२६ रोजी फिर्यादी सोनार हा सोने विक्रीसाठी जुन्या डिघोळअंबा रोडने मोटारसायकलवरून जात असताना दर्ग्याजवळ दोन मोटारसायकलवर आलेल्या चार अज्ञात व्यक्तींनी त्याचा मार्ग अडवला. आरोपींनी त्याच्या डोळ्यात तिखट चटणी टाकून मारहाण केली व चाकूचा धाक दाखवत हातातील सोन्याची पिशवी जबरदस्तीने हिसकावून घेतली आणि पसार झाले. या प्रकरणी पोलीस ठाणे युसुफ वडगांव येथे गु.र.नं. ४६/२०२६ कलम ३०९(६) बी.एन.एस. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोपींचा शोध घेण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखा आणि पोलीस ठाण्याचे पथक प्रयत्नशील होते. तपासादरम्यान जवळपास ५० पेक्षा अधिक सीसीटीव्ही फुटेजची पडताळणी करण्यात आली. गुप्त माहितीच्या आधारे संशयित रोहित रंजीत धिमधिमे यास अंबाजोगाई बसस्थानक परिसरातून ताब्यात घेण्यात आले. चौकशीदरम्यान त्याने सुदाम



गणपत सोनवणे (रा. डिघोळअंबा, ता. धारूर) व पोलीस अभिलेखावरील गुन्हेगार वीरसिंग रिसपालसिंग टाक (रा. अंबाजोगाई) यांच्या सांगण्यावरून इतर साथीदारांसह गुन्हा केल्याची कबुली दिली. त्यानुसार अभिषेक अशोक घाटुळ (रा. कन्हेवाडी, ता. परळी), कानिफनाथ विलास डुरकर (रा. क्रांती नगर, अंबाजोगाई) आणि यशोदिप कल्याण किर्दन (रा. सातेफळ, ता. अंबाजोगाई) यांना अटक करण्यात आली. एकूण सहा आरोपी जेरबंद करण्यात आले आहेत. आरोपींकडून गुन्ह्यात वापरलेल्या दोन मोटारसायकली (कि.अं. १,५०,०००), सहा मोबाईल (कि.अं. ९०,०००) तसेच जबरदस्तीने चोरून नेलेले सोन्याचे दागिने (कि.अं. ३,००,०००) ▶▶पान २ वर

### शिक्षक खमरोद्दीन फारुखी यांचा

## रस्ते अपघातात दुर्दैवी मृत्यू



**केज । प्रतिनिधी**

येथील रहिवासी आणि नांदूर घाट येथील मूकबधिर विद्यालयातील शिक्षक खमरोद्दीन सदरोद्दीन फारुखी (३८) यांचा शुक्रवारी रात्री केज-बीड रस्त्यावरील बरड फाट्याजवळ झालेल्या भीषण अपघातात मृत्यू झाला. ही दुर्घटना शुक्रवारी रात्री आठच्या सुमारास घडली जेव्हा फारुखी आपल्या दुचाकीवरून शाळेतून घराकडे परतत होते. बरड फाट्यानजीक त्यांच्या दुचाकीची धडक एका ट्रॅक्टर ट्रॉलीशी झाली, ज्यामध्ये ते गंभीर जखमी झाले होते. अपघातानंतर त्यांना तातडीने उपचारासाठी लातूर येथे ▶▶पान २ वर

## साडेतीन लाखांचा गुटखा जप्त

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील चांदणेवस्ती पेठ भागात स्थानिक गुन्हे शाखेने एका पत्र्याच्या शेडवर छापा टाकून ३ लाख ५९ हजार ३८८ रुपये किमतीचा अवैध गुटखा जप्त केला आहे. पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवारी, २८ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी पावणे नऊ वाजेच्या सुमारास ही धडक कारवाई करण्यात आली. जिल्हयातील अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्याच्या उद्देशाने पोलिसांनी ही मोहीम राबवली आहे. या

### बीडमध्ये स्थानिक गुन्हे शाखेचा छापा

कारवाईची सविस्तर माहिती अशी की, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली होती की, चांदणेवस्ती येथील एका पत्र्याच्या शेडमध्ये फेरोज दस्तगीर तांबोळी याने विविध कंपन्यांचा प्रतिबंधित गुटखा विक्रीसाठी साठवून ठेवला आहे. ▶▶पान २ वर



### पोलिस पाटील भरतीतील २० गुणांच्या

## मुलाखतीत सामान्य ज्ञानाला केवळ ३ गुण

### दहावी उत्तीर्ण उमेदवारांवर अन्याय-डॉ. गणेश ढवळे



**बीड । प्रतिनिधी**

पोलिस पाटील भरती प्रक्रियेदरम्यान समान संधीच्या तत्वाला हरताळ फासत बीड जिल्हा प्रशासनाने घेतलेल्या निर्णयाविरोधात सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी राज्याच्या वरिष्ठ पातळीवर लेखी तक्रार दाखल केली ▶▶पान २ वर

### काय आहे वादग्रस्त निर्णय?

पोलिस पाटील पदासाठी शैक्षणिक पात्रता १० वी उत्तीर्ण अशी असताना, २० गुणांच्या मुलाखतीत अधिक शिक्षणाला अतिरिक्त गुण देण्याचा निर्णय बीड जिल्हाधिकाऱ्यांनी जाहीर केला आहे. ✻ नवीन गुणांकन पद्धतीनुसार: १० वी उत्तीर्ण-५ गुण, १२ वी-अतिरिक्त ३ गुण, पदवी-अतिरिक्त ३ गुण, पोलिस पाटील वारस / माजी ▶▶पान २ वर

### आ.संदीप क्षीरसागरांनी

## उपस्थित केला पाण्याचा प्रश्न



**मुंबई । प्रतिनिधी**


बीड शहराच्या अमृत अटल योजनेचा आणि ग्रामीण भागातील जलजीवन मिशनचा अर्थातच शहरी आणि ग्रामीण भागातील नागरिकांसाठी मुलभूत असलेला प्रश्न आ.संदिप क्षीरसागर यांनी शुक्रवारी (दि.२७) रोजी विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मांडला. बीड शहर आणि ग्रामीण भागात पाणी पुरवठ्याचा प्रश्न हा अत्यंत जिव्हाळ्याचा झालेला आहे. बीड शहरातील अमृत अटल योजना सुरू करण्यासाठी थकलेले लाईट बील आणि ग्रामीण भागात जलजीवन मिशनची निधी अभावी रखडलेली कामे मार्गी लावण्यासाठी या अर्थसंकल्पात सदरील बाबींसाठी आर्थिक तरतूद ▶▶पान २ वर

### ७४ वर्षे जुनी शाळा बंद करण्याला

## आ.नमिता मुंदडा यांचा कडाडून विरोध

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधिमंडळाच्या अर्थ संकल्पीय अधिवेशनात शुक्रवारी केज विधानसभा मतदारसंघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी आपल्या मतदारसंघातील शिक्षण आणि पाणीपुरवठ्याच्या गंभीर प्रश्नांवरून सरकारचे लक्ष वेधले. सन २०२५-२६ च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेत सहभागी होत त्यांनी केज येथील १९५२ पासून सुरू असलेली जिल्हा परिषद माध्यमिक शाळा वाचवण्या साठी आणि रखडलेल्या पाणीपुरवठा योजना तातडीने पूर्ण करण्यासाठी आक्रमक पवित्रा घेतला. केज येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळा ही ऐतिहासिक वारसा




असलेली संस्था असून १९५२ पासून या शाळेने हजारो अधिकारी, इंजिनिअर्स आणि डॉक्टर घडवले आहेत. एकेकाळी १८०० पेक्षा जास्त विद्यार्थी संख्या असलेल्या या शाळेत २०२३ पासून पटसंख्या कमी झाल्याचे कारण देत शिक्षक पदे कमी करण्यात आली आणि अखेर शाळा बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयाचा फटका केज शहर आणि परिसरातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला बसत असल्याचे मुंदडा यांनी सभागृहात नमूद केले. विशेष म्हणजे, नगरपंचायतीने या शाळेची सुमारे चार एकर जागा 'अनयूज्ड' म्हणजेच वापराविना असल्याचे घोषित करून ती इतर कारणांसाठी वापरण्याचा ठराव केला आहे. या प्रकारामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी असून २६ जानेवारी २०२६ रोजी ५०० हून अधिक माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येत ही शाळा पुनरुज्जीवित करण्याचा ठराव केला आहे. शैक्षणिक उपयोगासाठी असलेली जागा अन्य कारणांसाठी ▶▶पान २ वर

## संपादकीय

# भारत–इस्त्रायल संबंध

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी दोन दिवसांच्या इस्त्रायल दौ–यावर आहेत. पंतप्रधान मोदींचा गत नऊ वर्षांतील हा दुसरा इस्त्रायल दौरा. जुलै २०१७ मध्ये पहिल्यांदा मोदी इस्त्रायल दौ–यावर गेले होते. त्या वेळी दोन्ही देशांतील संबंधांना सामरिक भागीदारीचा दर्जा देण्यात आला होता. या वेळी विज्ञान–तंत्रज्ञान, नवनिर्मिती, कृषि, संरक्षण, व्यापार अशा विविध क्षेत्रांत इस्त्रायलचे पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांच्याशी चर्चा करून दोन्ही देशांतील संबंध अधिक दृढ करण्याचा भारताचा प्रयत्न राहणार आहे. इस्त्रायलच्या दौ–यावर जाण्यापूर्वी मोदी यांनी दोन्ही देशांतील संबंध अधिक दृढ होतील याची खात्री असल्याचे वक्तव्य केले होते. बुधवारी पंतप्रधान मोदी इस्त्रायलमध्ये दाखल झाले तेव्हा त्यांचे भव्य स्वागत करण्यात आले. दोन्ही नेत्यांमध्ये प्रादेशिक आणि जागतिक मुद्यांवरही चर्चा करणार आहेत. सध्या इस्त्रायल जागतिक पातळीवर अनेक आव्हानांना सामोरे जात असताना भारताबरोबरचे संबंध महत्त्वाचे राहतील असे मानले जात आहे. या दौ–यात इस्त्रायलकडून आयर्न डोम सुरक्षा प्रणाली मिळवण्याचा भारताचा प्रयत्न राहणार आहे. पंतप्रधान मोदींनी इस्त्रायली संसद, नेसेटा संबोधित करताना भारताच्या इस्त्रायलशी असलेल्या घनिष्ठ संबंधांना उजाळा दिला. ७ ऑक्टोबर २०२३ रोजी हमासने केलेल्या दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या इस्त्रायली नागरिकांबद्दल शोक व्यक्त करून मोदी यांनी दहशतवादावर प्रहार केला. दहशतवादाचा मुकाबला करण्यासाठी सातत्यपूर्ण आणि समन्वित जागतिक कृतीची गरज आहे. कारण दहशतवाद कुठेही असला तरी तो सर्वत्र शांततेला धोका निर्माण करतो, असे मोदी म्हणाले. नागरिकांच्या हत्येचे कोणत्याही कारणाने समर्थन करता येणार नाही. आपण दहशतवादाचे कोणत्याही प्रकारे समर्थन करू शकत नाही. ७ ऑक्टोबर रोजी हमासने केलेल्या अमानवी दहशतवादी हल्ल्यात ज्यांनी जीव गमावला त्याबद्दल भारतीय जनतेच्या वतीने मोदींनी सहवेदना व्यक्त केल्या. भारत या क्षणी आणि पुढील काळात पूर्ण विश्वासाने इस्त्रायलसोबत खंबीरपणे उभा राहील, असे आश्वासनही दिले. दहशतवादाचा उद्देश समाजांना अस्थिर करणे, विकासात अडथळा आणणे आणि विश्वासाला तडा देणे असतो. म्हणून दहशतवादाचा सामना करण्यासाठी सतत आणि समन्वित जागतिक कृती आवश्यक आहे. दहशतवाद कुठेही असला तरी सर्वत्र शांततेला धोका निर्माण करतो. भारतानेही दीर्घकाळ दहशतवादाचे दु:ख सहन केले आहे. २६/११ च्या मुंबई हल्ल्याचे आणि इस्त्रायली नागरिकांसह निष्पाप लोकांचे बळी गेल्याचे स्मरण पंतप्रधान मोदींनी केले. भारत शाश्वत शांतता आणि प्रादेशिक स्थिरतेला हातभार लावणा–या सर्व प्रयत्नांना पाठिंबा देतो, असे त्यांनी सांगितले. इस्त्रायलने आपले सर्वांत प्रगत आणि आतापर्यंत जगापासून लपवून ठेवलेले 'गोल्डन होरायझन' हे हवेतून डागले जाणारे बॅलेस्टिक क्षेपणास्त्र भारताला देण्याची घोषणा केली आहे. विशेष म्हणजे अनेक देशांनी या शस्त्रासाठी इस्त्रायलकडे मागणी केली होती. पण इस्त्रायलने ही तंत्रज्ञान भागीदारी फक्त भारतासोबत करण्याचे निश्चित केले आहे. 'गोल्डन होरायझन' हे असे क्षेपणास्त्र आहे जे 'सुखोई'सारख्या लढाऊ विमानामधून डागले जाऊ शकते. भारताचे 'ब्रह्मोस' हे जगातील सर्वांत वेगवान क्रूझ क्षेपणास्त्र मानले जाते. त्याचा वेग ३ मॅक आहे. 'गोल्डन होरायझन'चा वेग ५ मॅकपेक्षाही जास्त आहे. या प्रचंड वेगामुळे जगातील कोणतीही रडार प्रणाली किंवा क्षेपणास्त्रविरोधी यंत्रणा त्याला रोखू शकत नाही. हे क्षेपणास्त्र शत्रूच्या भूमीतील खोलवरचे बंकर्स, मजबूत किल्ले आणि अत्यंत सुरक्षित अणुप्रकल्प नष्ट करण्यासाठी डिझाईन केलेले आहे. इस्त्रायलच्या क्रांतिकारी 'आयर्न बीम' या लेझर आधारित संरक्षण प्रणालीवरही शिक्कामोर्तब झाले आहे. 'गोल्डन होरायझन'सारखे शस्त्र मिळणार असल्याने भारताच्या संरक्षण विभागाची ताकद वाढणार आहे. पंतप्रधान मोदींचा हा इस्त्रायल दौरा केवळ राजनैतिक सौजन्यापुरता मर्यादित नाही, तर तो भारताच्या लष्करी सामर्थ्याला नवी दिशा देणारा असणार आहे. पाकिस्तानसोबतच्या संघर्षाचे अनुभव, ड्रोन हल्ले आणि लांब पल्ल्याच्या चिनी क्षेपणास्त्रांचा धोका लक्षात घेता भारत इस्त्रायलकडून आयर्न डोम आणि आयर्न बीमसारखे तंत्रज्ञान मिळवणार आहे. इराणचे परराष्ट्रमंत्री अब्बास अराघची यांनी गाझापट्टीतील परिस्थितीवर चिंता व्यक्त करताना म्हटले की, इस्त्रायलने संपूर्ण गाझा उद्ध्वस्त केला आहे. ७५ हजारांहून अधिक लोक मारले गेले आहेत. पंतप्रधान मोदी सध्या इस्त्रायलमध्ये आहेत. त्यांनी पॅलेस्टिनी जनतेच्या अधिकाराबद्दल भाष्य करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. भारताचा इतिहास पाहता इस्त्रायल हा भारताचा कधीच नैसर्गिक मित्र नव्हता. पण गत दशकभरात सारी गणिते बदलली आहेत. नरेंद्र मोदी यांनी जाणीवपूर्वक या देशाशी मैत्री वाढवली आहे. मोदी यांच्या कारकीर्दीमध्ये इस्त्रायल हा भारताचा महत्त्वाचा मित्र ठरला आहे. गाझापट्टीमध्ये इस्त्रायल–पॅलेस्टिन संघर्ष सुरू आहे. इस्त्रायलच्या विरोधात अनेक इस्लामिक देश एकत्र येण्याचे प्रमाण वाढले आहे. त्याला तोंड देण्यासाठी इस्त्रायलचे पंतप्रधान नेतान्याहू यांनी एक वेगळा इस्लामविरोधी गट स्थापण्याचा निर्णय घेतला आहे. या गटात भारत, रशिया आणि आणखी काही देश असणार आहेत. त्यादृष्टीनेही मोदींचा दौरा महत्त्वाचा आहे. दोन्ही देशांत गेल्या काही वर्षांत व्यापारी संबंधसुध्दा चांगल्या प्रमाणात विकसित झाले आहेत. इस्त्रायलमध्ये निर्यात करणारा भारत हा आशियामधील चीननंतरचा दुसरा देश ठरला आहे. इस्लामिक राष्ट्रांच्या दडपशाहीसमोर झुकायचे नाही हा इस्त्रायलचा एक कलमी कार्यक्रम आहे. या कार्यक्रमात त्यांना मोदीसारखा मित्र मिळाला तर त्यांना तो हवाच आहे. संरक्षण वस्तूंच्या उत्पादनामध्ये इस्त्रायल आघाडीवर आहे. त्यांची मदत भारतासाठी फायदेशीर ठरणार आहे. भारत आणि इस्त्रायलमधील वाढती मैत्री पाकिस्तानसह अनेक इस्लामिक राष्ट्रांना खुपणारी असली तरी ते काहीच करू शकणार नाहीत. मोदी यांच्या इस्त्रायल दौ–यामुळे दोन्ही देशांमधील मैत्रीला एक वेगळे परिमाण मिळणार यात शंका नाही.

# केरळचे नवे नामकरण



केंद्र सरकारने नुकताच एक मोठा निर्णय घेतला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींचे नवीन कार्यालय सेवातीर्थमध्ये मंगळवारी केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक झाली. यावेळी केंद्रीय मंत्रिमंडळाने केरळ सरकारचा राज्याचे नाव बदलून 'केरळम' करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली. केरळच्या राज्य सरकारने या संदर्भातील प्रस्ताव केंद्राकडे पाठवला होता. त्याला आता केंद्र सरकारने मान्यता दिली आहे. कोणत्याही नव्या नामकरणासंदर्भात 'नावात काय आहे' असा प्रश्न उपस्थित केला जातो, परंतु अखेर 'नावात सारे काही आहे' असे म्हणावे लागते. केरळमध्ये एप्रिल–मे महिन्यात होणा–या राज्याच्या विधानसभा निवडणुकीपूर्वी हा निर्णय घेण्यात आल्याचे बोलले जात आहे. राज्याच्या सांस्कृतिक आणि भाषिक ओळखीचा आदर करण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आल्याचे सरकारने म्हटले आहे. केरळचे नाव बदलून केरळम करण्यासाठी केरळ विधानसभेने २४ जून २०२४ रोजी एकमताने एक ठराव मंजूर केला होता. यामध्ये केंद्र सरकारला राज्याचे नाव 'केरळ'वरून 'केरळम' असे करण्याची विनंती केली होती. यापूर्वी असाच एक ठराव मंजूर करून ऑगस्ट २०२३ मध्ये केंद्र सरकारकडे पाठवण्यात आला होता. केंद्रीय गृहमंत्रालयाने या प्रस्तावाचा आढावा घेतला आणि काही तांत्रिक बदल सुचवले. त्यानंतर राज्य विधानसभेने सुधारित ठराव पुन्हा मंजूर केला, जो आता केंद्र सरकारने मंजूर केला आहे. केरळचे मुख्यमंत्री पिनारायी विजयन यांनी हा प्रस्ताव मांडला होता. केरळम हा राज्याचा मूळ आणि स्थानिक उच्चार आहे. तो राज्याची सांस्कृतिक ओळख चांगल्या प्रकारे प्रतिबिंबित करतो, असा युक्तिवाद त्यांनी प्रस्ताव सादर करताना केला होता. केरळ विधानसभेने एकमताने ठराव मंजूर करून केंद्राकडे पाठवला होता. मल्याळम भाषेत राज्याला 'केरळम' असे संबोधले जाते. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३ नुसार राज्याचे नाव बदलण्याची प्रक्रिया केली जाते. भाषेच्या आधारावर राज्याची निर्मिती झाल्यापासून केरळचे नाव केरळम करावे अशी मागणी होत होती. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले की, केरळचे नाव बदलण्याचे विधेयक आता राज्य विधानसभेत मंजुरीसाठी पाठवले जाईल. नवीन पंतप्रधान कार्यालय इमारतीत झालेल्या पहिल्या मंत्रिमंडळ बैठकीत १.४ अब्ज लोकांच्या हिताचे सर्व निर्णय घेण्याचा ठराव मंजूर करण्यात आला. या वर्षाच्या सुरुवातीला भारतीय जनता पक्षाचे केरळ प्रदेशाध्यक्ष राजीव चंद्रशेखर यांनीही पंतप्रधान मोदी यांना पत्र लिहून राज्याचे अधिकृत नाव 'केरळ'वरून 'केरळम' करण्याची मागणी केली होती. आता हे नाव बदलण्यासाठी संसदेत एक घटनादुरुस्ती प्रस्ताव मांडला जाईल. आता काही जण असाही प्रश्न उपस्थित करतात की केरळम हे खरोखरच राज्याचे स्वत:चे नाव आहे की ते राजकीय सोयीसाठी बनवले जात आहे? राज्याचे ते स्वत:चे नाव असेल तर या शब्दाचा अर्थ काय? स्वातंत्र्यापूर्वी जेव्हा भारत मुघल आणि ब्रिटिशांच्या आधिपत्याखाली होता, तेव्हा केरळला काय म्हटले जायचे असाही प्रश्न केला जातो. त्याचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न केला असता असे दिसून येते की, केरळ हे नाव खूप प्राचीन मानले जाते. सम्राट अशोकाच्या तिस–या शतकातील शिलालेखांमध्ये 'केरळपुत्र' असा उल्लेख आढळतो. केरळमध्ये राहणा–या लोकांसाठी तो वापरला जात असे. संगम साहित्यात 'चेरल' किंवा 'केरळ' सारखे शब्द आढळतात. 'केरळ' हा शब्द दोन शब्दांपासून बनलेला आहे. 'केरळ' म्हणजे नारळ आणि 'आलम' म्हणजे जमीन. केरळ ही अरबी समुद्राच्या काठावरील एक लांब पट्टी, जिथे नारळाची झाडे मुबलक प्रमाणात आढळतात. म्हणून 'केरळ' हे नाव त्याला चपखल बसते. काही इतिहासकारांचे म्हणणे असे की, 'केरळ' हा शब्द चेर राजवंशाच्या काळात वापरात आला. त्या काळात चेर राजवंशाच्या अंतर्गत असलेल्या भागात राहणा–या लोकांना केरळचे रहिवासी म्हटले जात असे. यावरून हे स्पष्ट होते की, 'केरळ' हे नाव एका व्यक्तीने तयार केलेले नाही, तर प्राचीन ऐतिहासिक आणि सांस्कृतिक विकासाचा तो परिणाम आहे. १ नोव्हेंबर १९५६ रोजी केरळ राज्याची निर्मिती झाली. तत्पूर्वी हा प्रदेश वेगवेगळ्या प्रशासकीय विभागात विभागला गेला होता. ब्रिटिश राजवटीत ते तीन भागांमध्ये विभागले गेले होते. एका प्रदेशाला मलबार प्रदेश असे संबोधले जायचे. याला मद्रास प्रेसिडेन्सीचा भाग मानला जात असे. राज्याचा दुसरा भाग त्रावणकोर. स्थानिक राजाच्या आधिपत्याखाली तो होता. नाममात्र स्वायत्त असूनही ते ब्रिटिशांच्या नियंत्रणाखाली होते. तिसरा प्रदेश म्हणजे कोचीन राज्य. स्वातंत्र्यानंतर १९४९ मध्ये त्रावणकोर आणि कोचीन यांचे विलीनीकरण करून त्रावणकोर – कोचीन हे नवीन राज्य तयार करण्यात आले. मलबार प्रदेश मद्रास राज्याचा भाग राहिला. पण लोकांना ते आवडले नाही. त्यांनी सर्व मल्याळम भाषिक क्षेत्राचे एकत्रीकरण करून एक नवीन राज्य स्थापन करण्याची मागणी केली. इतर राज्यांमध्येही अशाच मागण्या सुरू होत्या. त्यामुळे भाषिकवार प्रांत रचना करण्यासाठी एक आयोग स्थापन करण्यात आला. आयोगाच्या शिफारशीनुसार तिन्ही प्रदेशांचे विलीनीकरण करून केरळ राज्याची स्थापना करण्यात आली. केंद्रात जेव्हापासून एनडीएचे सरकार आले आहे तेव्हापासून अनेक राज्यांत शहरांची नावे बदलण्यात आली आहेत. केंद्र सरकारच्या या भूमिकेवर टीकाही झाली आहे. मात्र आता केंद्राने देशातील एका राज्याचे नाव बदलण्यास मंजुरी दिली आहे. त्यामुळे त्या राज्यात भाजपला तसेच मित्रपक्षांना काही फायदा होईल का ते बघावे लागेल. मोदी सरकारने केरळचे नाव बदलून केरळम करण्यास लगेच मंजुरी दिली. मात्र, आम्ही पश्चिम बंगालचे नाव बदलून 'बांग्ला' करण्याबाबत सातत्याने विनंती करून देखील जाणीवपूर्वक टाळाटाळ करण्यात येत आहे अशी टीका पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी केली आहे. भाजप आणि माकप (डावे) यांची आघाडी बळकट होत असल्यामुळेच केरळच्या नामांतराचा प्रस्ताव तातडीने मंजूर करण्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला. एक दिवस भाजपची सत्ता जाईल आणि तेव्हा आम्ही पश्चिम बंगालचे नाव बदलू, असा दावा मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी केला. नावात काय नाही नावात सारे काही आहे!

## पान १ वरून

### सरपंचाला जनतेनेच...

समिती गटविकास अधिकारी यांच्याकडे सुपूर्द करुन पारीत झाला. जिल्हाधिकारी यांच्या आदेशावरुन गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवार दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी याठिकाणी विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये एकूण ९७२ मतदारांनी सहभाग घेतला होता. यापैकी ६७४ मतदारांनी सरपंचांच्या विरोधात तर २९८ मतदारांनी सरपंचांच्या बाजूने बाजु घेतल्याने सरपंच सौ. मुक्ताबाई अंकुश राठोड यांच्या विरोधात ठराव मंजूर झाला. यावेळी वडवणी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे, सहाय्यक गटविकास अधिकारी शेखर पोहनेरकर, विस्तार अधिकारी अशोक निर्डे, शेख रफीक सर, दिपक जोगदंड, ग्रामपंचायत अधिकारी व्ही. बी. पवार, सचिव गोवर्धन गिरी यांच्यासह वडवणी पोलीस स्टेशनच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक वर्षा व्हगाडे यांच्यासह पोलीस कर्मचारी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

### रस्ते आपघातात...

हलवण्यात आले, मात्र शनिवारी पहाटे उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात अत्यंत सक्रिय आणि परिचित व्यक्तिमत्त्व असलेल्या खमरोद्दीन फारुखी यांच्या जाण्याने संपूर्ण तालुक्यात हळहळ व्यक्त केली जात आहे. त्यांच्या पश्चात पत्नी आणि दोन मुले असा परिवार आहे. त्यांच्या निधनामुळे नांदूर घाट येथील मूकबधिर शाळेतील विद्यार्थी आणि कर्मचारी वर्गावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. एका उमद्या शिक्षकाच्या अकाली निधनामुळे समाजमनातून तीव्र दु:ख व्यक्त होत आहे.

### साडेतील लाखांचा...

या माहितीच्या आधारे पोलिसांनी पथक तयार करून संबंधित ठिकाणी छापा मारला. पोलिसांना पाहताच संशयित आरोपी फेरोज तांबोळी घटनास्थळावरून पळून जाण्यात यशस्वी झाला. मात्र, त्याच्या घराच्या बाजूला असलेल्या शेडची झडती घेतली असता, तेथे महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला मोठ्या प्रमाणावरील साठा मिळून आला. या प्रकरणी पेठ बीड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. सदर कारवाईमध्ये पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर, राहुल शिंदे, युनुस बागवान, गोविंद राख, स्वाती मुंडे, अशपाक सय्यद, मनोज परजणे आणि नितीन वडमारे यांनी सहभाग घेतला. अवैध विक्री करणाऱ्यांविरोधात पोलिसांचा हा कडक इशारा मानला जात असून, फरार आरोपीचा शोध सध्या पोलीस घेत आहेत.

### मुलाखतीत सामान्य...

आहे. ही तक्रार राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, महसूल सचिव (मंत्रालय, मुंबई) तसेच विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्याकडे करण्यात आली आहे. ✻ समान संधी तत्वाचा भंग : डॉ. ढवळे यांनी नमूद केले की, ज्या पदासाठी जी शैक्षणिक पात्रता निश्चित आहे, त्याच निकषावर मूल्यांकन होणे अपेक्षित असते. अधिक शिक्षण असलेल्या उमेदवारांना स्वतंत्र अतिरिक्त गुण देणे म्हणजे १० वी उत्तीर्ण उमेदवारांवर अन्याय होय. लोकसेवा आयोगाच्या परीक्षांमध्ये देखील अधिक शैक्षणिक पात्रतेसाठी वेगळे गुण देण्याची पद्धत नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ✻ शासन निर्णयाचा चुकीचा अर्थ? : शासन निर्णयानुसार, दोन उमेदवारांना लेखी व तोंडी परीक्षेत समान गुण मिळाल्यास प्राधान्यक्रमासाठी – ✻ अधिक शिक्षण ✻ पोलिस पाटील वारस ✻ गृहरक्षक दल सदस्य ✻माजी सैनिक असा क्रम दिला आहे. मात्र हा प्राधान्यक्रम गुणांकनासाठी नव्हे, तर टाय–ब्रेक परिस्थितीसाठी असल्याचे डॉ. ढवळे यांनी नमूद केले. त्यामुळे बीड जिल्हा प्रशासनाने शासन निर्णयाचा चुकीचा अर्थ लावून मुलाखतीतील गुणांकनात बदल केल्याचा आरोप करण्यात आला आहे. ✻ चौकशीची मागणी : सदर निर्णयामुळे दहावी उत्तीर्ण उमेदवारांवर अन्याय होत असल्याने या प्रकरणाची सखोल चौकशी करून तातडीने आवश्यक सुधारित आदेश काढावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

## पान १ वरून

### काय आहे वादग्रस्त...

सैनिक / गृहरक्षक दल–अतिरिक्त गुण, सामान्य ज्ञान (मुलाखतीत) – केवळ ३ गुण यामुळे केवळ १० वी उत्तीर्ण उमेदवारांना प्रत्यक्ष मुलाखतीत स्पर्धात्मक संधी मर्यादित होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

### आ.नमिता मुंदडा...

वापरणे हे विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर अन्याय करणारे असून नगरपंचायतीचा हा ठराव रद्द करून शाळा पूर्ववत सुरू करावी, अशी आग्रही मागणी त्यांनी मंत्री महोदयांकडे केली. शिक्षण क्षेत्रातील या प्रश्नासोबतच नमिता मुंदडा यांनी मतदारसंघातील पाणीटंचाईच्या मुद्द्यावरही सरकारला अवगत केले. जलजीवन मिशन अंतर्गत सुरू असलेल्या अनेक पाणीपुरवठा योजनांची कामे सध्या अपूर्ण किंवा अर्धवट स्थितीत आहेत. यामुळे ग्रामीण भागातील महिला आणि नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मैलोन्मैल पायपीट करावी लागत आहे. उन्हाळा जवळ येत असल्याने ही परिस्थिती अधिक बिकट होण्याची शक्यता आहे. शासनाने या कामांमध्ये दिरंगाई करणाऱ्या गुत्तेदारांची जबाबदारी निश्चित करावी आणि ही कामे प्राधान्याने पूर्ण करण्याचे आदेश द्यावेत, जेणेकरून नागरिकांना नियमित आणि शुद्ध पाणी उपलब्ध होईल, असे त्यांनी स्पष्ट केले. मुंदडा यांनी मांडलेल्या या मुद्द्यांमुळे मतदारसंघातील प्रलंबित प्रश्नांवर आता सरकार काय भूमिका घेणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### दरोडेखोरांची टोळी...

असा एकूण ५,४०,००० किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपासासाठी आरोपी व मुद्देमाल पोलीस ठाणे युसुफ वडगांव यांच्या ताब्यात देण्यात आला आहे. ही कारवाई नवनीत कॉंवत, पोलीस अधीक्षक, बीड, चेतना तिडके, अपर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई, तसेच शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने व त्यांच्या पथकातील पोलीस हवालदार जफर पठाण, महेश जोगदंड, दिलीप गिते, मारुती कांबळे, दिपक खांडेकर, गणेश मराडे, विकी सुरवसे यांनी केली.

### आ. संदीप क्षीरसागरांनी...

व्हावी अशी मागणी आ.संदिप क्षीरसागर यांनी सभागृहात केली. बीड शहराला गरजेनुसार पाणी पुरवठा व्हावा या करीता तब्बल १२५ कोटी रूपयांची अमृत अटल पाणी पुरवठा योजना मंजुर होऊन त्याचे काम देखील पुर्ण झालेले आहे. परंतु बीड नगरपालिकेकडे असलेली वीज बीलाची थकबाकी आणि त्या थकबाकी वरील प्रचंड झालेले व्याज नगरपालिका भरू शकत नसल्याने नविन पाणी पुरवठा योजनेला वीज कनेक्शन दिले जात नाही. त्यामुळे बीड शहराला जुन्या योजनेतून पाणी पुरवठा होतो. हा होणारा पाणी पुरवठा बीड शहराची लोकसंख्या आणि गरज यांच्या तुलनेत अतिशय अपुरा आहे. त्यामुळे बीड शहरात ०८ ते १० दिवसातून एकदा पाणी येते. बीड शहराला ज्या जलस्त्रोतांमधून पाणी पुरवठा होतो त्या, माजलगाव बॅकवॉटर आणि बिंदुसरा प्रकल्पात मुबलक पाणी असताना देखील केवळ थकलेले वीज बील आणि त्यामुळे मिळत नसलेले वीज कनेक्श्न यांच्यामुळे बीड शहराला पाणी उपलब्ध असून देखील पाणी मिळत नाही. हि बाब लक्षात घेवून या अर्थसंकल्पात बीड शहराचा पाणी पुरवठा सुरळीत व्हावा या करीता वीज बीलाच्या थकबाकीवरील व्याज माफ करण्याकरीता आर्थिक तरतुद करण्यात यावी अशी मागणी आ.संदिप क्षीरसागर यांनी अधिवेशनात शासनाकडे केली. तसेच, ग्रामीण भागातील पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वकांक्षी असलेली योजना म्हणजे जलजीवन मिशनची कामे मागील अनेक काळापासुन निधीच्या अभावामुळे रखडलेली आहेत. जलजीवन मिशन ही योजना ग्रामीण भागातील सर्व घरांना वैयक्तिक घरगुती नळजोडणीव्दारे सुरक्षीत आणि पुरेसे पिण्याचे पाणी पुरवण्याची एक सुंदर संकल्पना आहे. परंतु निधी न मिळाल्यामुळे हि योजना रखडत पडलेली आहे. सदरील योजनेला निधी उपलब्ध करून न दिल्यास या योजनेवर आत्तापर्यंत झालेला शासनाचा खर्च देखील व्यर्थ जाईल. हि बाब लक्षात आणून देत आ.क्षीरसागर यांनी जलजीवन मिशन योजने करीता निधीची स्वतंत्र तरतुद करण्याची मागणी केली.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

मराठवाडा पत्र



## शासनाने शिक्षण संस्था चालकांना
# वेठबिगार समजू नये-प्रा.सुशिलाताई मोराळे

**बीड ।** प्रतिनिधी

परीक्षा आणि परीक्षेतील गैरप्रकाराशी संस्थाचालकांचा संबंध नाही, शासनाने शिक्षण संस्था चालकांना वेठबिगार समजू नये, असे खडकावून सांगत, परीक्षा केंद्रावर विद्यार्थ्यांकडून अनुचित प्रकार घडल्यास अथवा कॉपी केस झाल्यास मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख व संस्था चालकांवर गुन्हा दाखल करण्याचा आदेश शासनाने रद्द करावा. या मागणीसाठी २८ मार्च २०२६ ला राज्य शिक्षण संस्था महामंडळाची कार्यकारणी या विरोधात शासनाकडे निवेदन देऊन संस्थाचालकांची बाजू मांडणार असल्याचे राज्य शिक्षण संस्था महामंडळाच्या कार्यकारणी सदस्या प्रा. सुशीलाताई मोराळे यांनी प्रसिद्धीला दिले आहे. संपूर्ण राज्यात दहावी व बारावीच्या परीक्षा सुरू असून या परीक्षा विविध मंडळामार्फत घेतल्या जातात. परीक्षा कॉपीमुक्त व्हाव्यात कॉपीचे निर्मूलन व्हावे. शिक्षणाची गुणवत्ता टिकवण्यासाठी ही बाब आवश्यक आहे. परीक्षेच्या दरम्यान संस्थाचालक परीक्षेसाठी आपल्या इमारती उपलब्ध करून देतात. शासनाला सहकार्य करतात. एखाद्या परीक्षा केंद्रावर विद्यार्थ्यांकडून



अनुचित प्रकार घडल्यास अथवा कॉपी केस झाल्यास मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख व संस्था चालकांवर गुन्हा दाखल केला जाईल. हा आदेश शासनाने पारित केला आहे. त्या आदेशाला संस्थाचालकांचा विरोध असून जेव्हा परीक्षा संदर्भात बैठका घेतल्या जातात. त्या बैठकीत केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक व प्राचार्य उपस्थित राहतात. तिथे संस्थाचालकांना बोलवले जात नाही. परीक्षेशी संस्थाचालकांचा काही एक संबंध नसून सदरील परीक्षेत परीक्षार्थींकडून चुका घडतात. आणि त्याची शिक्षा संस्थाचालकांना हा तुघलकीय आदेश तात्काळ रद्द करावा. बरोबर शासनाने संस्थाचालकांना सन्मानाने वागवावे. येत्या २८ मार्च २०२६ ला राज्य शिक्षण संस्था महामंडळाची कार्यकारिणी या विरोधात शासनाकडे निवेदन देऊन संस्थाचालकांची बाजू मांडणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री व शालेय शिक्षण मंत्री यांना निवेदन देण्यात येणार आहे. राज्य शिक्षण संस्था महामंडळाच्या कार्यकारणी सदस्य प्रा. सुशीलाताई मोराळे यांनी प्रसिद्धीला दिले आहे. यासाठी संस्थाचालकांनी राज्य शिक्षण संस्था महामंडळाच्या भूमिकेला समर्थन द्यावे असे आवाहनही त्यांनी केले आहे.

## तांदळेश्वर विद्यालयाचे
# एनएमएमएस परीक्षेत यश

**बीड ।** प्रतिनिधी

नवगण शिक्षण संस्था राजुरी नवगणचे तांदळेश्वर विद्यालय तांदळवाडी घाट या शाळेमधील विद्यार्थ्यांनी एनएमएमएस परीक्षेत चांगले यश मिळवले आहे त्यामुळे संस्थेचे सचिव डॉक्टर योगेश जी क्षीरसागर यांनी व संस्था प्रशासनाधिकारी गुट्टे सर व देशमाने सर यांनी अभिनंदन केले आहे. या परीक्षेमध्ये एकूण पाच विद्यार्थी बसले होते त्यामध्ये दोन विद्यार्थ्यांनी प्राविण्य मिळवले आहे. यामध्ये दिव्या गोरख जगताप व आरती गोविंद खोसे या विद्यार्थिनींनी आर्थिक दुर्बल घटक राष्ट्रीय स्तरावरील ही परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल अंधापुरी घाट व तांदळवाडी घाट या दोन्ही गावातून व पंचक्रोशीतून त्यांच्या अभिनंदन होत आहे. विद्यालयाचे प्राचार्य श्याम डाके सर् व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी या विद्यार्थिनींना अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली गेवराई तालुक्यात युवासेनेच्या ११ शाखांचा शुभारंभ
# युवासेनेच्या माध्यमातून शिवसेनेची ताकद वाढली

**बीड ।** प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच संसदरत्न खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, युवासेना कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक, युवासेना मुख्य सचिव राहुल लोंढे, युवासेना सचिव (महाराष्ट्र) किरण साळी तसेच युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली गेवराई तालुक्यात युवासेनेच्या ११ शाखांचे उद्घाटन करण्यात आले. उद्घाटन झालेल्या शाखांमध्ये राजपिंपरी, वाघदरातांडा, महादेव तांडा, देवपिंपरी, भाट अंतरवाली फाटा, आहेर वस्ती, खळेगाव फाटा, ब्रह्मगाव, ब्रह्मगाव फाटा, चव्हाणवाडी व माटेगाव या गावांचा समावेश असून ही सर्व गावे तालुका गेवराई, जिल्हा बीड येथील आहेत. या कार्यक्रमाचे संयोजक युवासेना तालुका प्रमुख बबन (आप्पा) मोघे होते. उद्घाटनासाठी प्रमुख उपस्थिती मराठवाडा निरीक्षक श्री.अविनाश भाऊ जाधव व शिवसेना जिल्हाप्रमुख चंद्रकांत (आप्पा) नवले व युवा सेना जिल्हाप्रमुख अजय भैय्या सुरवसे, युवा सेना जिल्हाप्रमुख सुमित भैया कोळपे युवा सेना तालुकाप्रमुख बबन आप्पा मोघे शिवसेना उपजिल्हाप्रमुख नारायण राव शिंदे शिवसेना शहरप्रमुख मुकेश अण्णा महाजन शिवसेना ज्येष्ठ नेते लिंबाजी



मामा जाधव शिवसेना जिल्हा संघटक विक्रम भोसले शिवसेना विधानसभा प्रमुख नवनाथ गवते युवासेना विधानसभा प्रमुख उमेश शिंदे युवा सेना शहरप्रमुख गणेश पवार युवा सेना धोंडराई सर्कल प्रमुख अंकुशराव मोरे युवा नेते पिंटू भैया पानखडे गणेशराव चव्हाण विठ्ठलराव पवार तात्यासाहेब चव्हाण सर्व शाखांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, युवा सेना शिवसेना पदाधिकारी उपस्थित होते धोंडराई सर्कल मधल्या या गावांमध्ये, राजप्रिंप्री, महादेव तांडा, माटेगाव, देवप्रिंप्री, ब्रह्मगाव, भट अतंरवाली, वाघदरा तांडा, खळेगाव, आहेर वस्ती, चव्हाणवाडी अशा अनेक गावांमध्ये शाखांचे उद्घाटन पार पडले. यांच्यासह शिवसैनिक, युवासैनिक, शाखाप्रमुख, पदाधिकारी, गावातील नागरिक व मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी भाषणात चंद्रकांत आप्पा नवले यांनी शिवसेना, युवासेना, शेतकरी सेना आणि वारकरी संप्रदाय हे आपल्या कुटुंबाचा भाग असल्याचे सांगून हे संघटनात्मक कुटुंब अधिक व्यापक कसे करता येईल यासाठी शिवसैनिकांनी प्रयत्न केले पाहिजेत, असे आवाहन केले. या नव्या शाखांमुळे गेवराई तालुक्यात युवासेनेच्या माध्यमातून शिवसेनेची संघटनात्मक ताकद अधिक बळकट झाल्याची भावना पदाधिकार्यांनी व्यक्त केली.

## धनंजय मुंडेंच्या केसाला धक्का लागला तर...
# जरांगे आणि सुरेश धसांना थेट धमकी



**मुंबई ।** प्रतिनिधी

मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते धनंजय मुंडे यांच्यातील राजकीय वैर सर्वांनाच माहित आहे. त्यानंतर आता धनंजय मुंडे यांच्याबाबत करण्यात आलेल्या एका फेसबुक पोस्टमुळे मोठी खळबळ उडाली आहे. धनंजय मुंडे यांच्या केसालाही धक्का लागला तर कार्यक्रम खल्लास भंडारा लावून बोलतोय, अशा आशयाची पोस्ट धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय आणि परळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती गोविंद फड यांनी फेसबुकवर केल्याने राजकीय वर्तुळात तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. या पोस्टमधून मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील आणि भाजप आमदार सुरेश धस यांना धमकीवजा इशारा देण्यात आल्याचा आरोप केला जात आहे. गेल्या काही दिवसांपासून बीड जिल्ह्यातील राजकारणात आरोप-प्रत्यारोपांचे सत्र सुरू आहे. विविध आंदोलनांदरम्यान नेतेमंडळींवर टीका होत असताना गोविंद फड यांच्या पोस्टने मोठी खळबळ उडाली आहे. सोशल मीडियावर पोस्ट व्हायरल झाल्यानंतर समर्थक आणि विरोधकांकडून तीव्र प्रतिक्रिया उमटत आहे. गोविंद फड यांनी फेसबुक पोस्टमध्ये थेट नावे घेत जरांगे पाटील आणि सुरेश धस यांना उद्देशून भाष्य केल्याने हा प्रकार अधिक गंभीर मानला जात आहे. काही जणांनी या पोस्टला खुले आव्हान म्हणून पाहिले असून, राजकीय दबावाखाली अशी भाषा वापरणे चुकीचे असल्याची टीका केली जात आहे. तर दुसरीकडे, धनंजय मुंडे यांच्या समर्थकांकडून फड यांच्या भूमिकेचे समर्थन करण्यात येत आहे.

# प्रतिभेचा अनुबंध जपला पाहिजे-डॉ.बनसोडे
## स्वा.सावरकर महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन

**बीड ।** प्रतिनिधी

देशातील साहित्यिकांनी निर्माण केलेल्या साहित्यामध्ये प्रतिभेचा मोठा अनुबंध आहे, तो अनुबंध जपला पाहिजे असे प्रतिपादन डॉ. संदीप बनसोडे यांनी केले. येथील स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयामध्ये आयोजित मराठी भाषा गौरव दिन कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष प्रा. चंद्रकांत मुळे हे होते. व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे, उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, मराठी विभाग प्रमुख सोपान सुरवसे यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ बनसोडे म्हणाले की मराठी भाषेला समृद्ध असा वारसा आहे. वि. वा. शिरवाडकर, स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी त्यांच्या साहित्यातून भाषेला एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले. साहित्यिकांच्या प्रतिभेचा हा समृद्ध असा अनुबंध जपला पाहिजे असे ते म्हणाले. यावेळी बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुहास मोराळे म्हणाले की स्वातंत्र्यवीर सावरकरांनी मराठी भाषेला अनेक शब्द दिले आहेत. सावरकरांचे समग्र साहित्य प्रेरणादायी आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ. सोपान सुरवसे यांनी केले. सूत्रसंचालन मराठी विभागातील डॉ मेधा गोसावी यांनी केले. आभार प्रा. संजय काळे यांनी मानले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते महाविद्यालयाच्या परिसरात मराठी विभागाने तयार केलेल्या 'अक्षराचे झाड' उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.


नमुना ई-४
(नियम १८ पहा)

निवडणूक निर्णय अधिकारी :- श्री.एस.ए.गायकवाड — पदनाम:- सहकार अधिकारी श्रेणी-२
सहकारी संस्थेचे नाव :- पाटोदा तालुका औद्योगिक बहुउदेशिय ग्रामीण सहकारी संस्था म.पाटोदा ता.पाटोदा जि.बीड — अंतिम मतदार यादी प्रसिध्दी दिनांक:- १७.११.२०२५

महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) नियम -२०१४ चे नियम १८ प्रमाणे अधिकाराचा वापर करुन आणि मा.राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण,महाराष्ट्र राज्य,पुणे व मा.जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी बीड यांनी जाहीर केलेल्या उपरोक्त संस्थेच्या सदस्यांच्या निवडी करीता मी एस.ए.गायकवाड सहकार अधिकारी श्रेणी-२ ,संलग्न सहायक निबंधक,सहकारी संस्था,ता.आष्टी जि.बीड सेवा वर्ग- पाटोदा आणि मा.जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी व मा.राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, म.रा.पुणे यांचे पुर्व मान्यतेने पाटोदा तालुका औद्योगिक बहुउदेशिय ग्रामीण सहकारी संस्था म.पाटोदा ता.पाटोदा जि.बीड यांच्या समितीच्या सदस्यांची सन २०२५-२६ ते २०३०-३१ या कालावधीची निवडणुक घेण्याकरीता नियुक्त केलेला, निवडणुक निर्णय अधिकारी याद्वारे पाटोदा तालुका औद्योगिक बहुउदेशिय ग्रामीण सहकारी संस्था म.पाटोदा ता.पाटोदा जि.बीड म्हणुन ओळखल्या जाणाऱ्या सहकारी संस्थेच्या समितीच्या सदस्यांची निवड करण्याच्या निवडणुकीच्या कार्यक्रमातील विविध टप्पे तयार करुन दि.०२.०३.२०२६ पासुन जाहीर करीत आहोत आणि या सोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ -२ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मतदार संघाच्या किंवा मतदार संघाच्या संबंधातील निवडणुक नियत करीत आहोत.

अनुसूची

| अ.क्र. | मतदार संघाचे नाव | | नामनिर्देशन पत्रे दाखल करण्यासाठी शेवटचा दिनांक | नामनिर्देशन पत्राच्या यादीची प्रसिध्दी | नामनिर्देशन पत्राच्या छाननीचा दिनांक व वेळ | विधी ग्राह्य नामनिर्देश पत्राची सुची प्रसिध्दी करण्याचा दिनांक | उमेदवाराने नामनिर्देशपत्रे मागे घेण्याचा दिनांक | निवडणुक लढविणाऱ्या उमेदवारांना निशानिचे वाटप व अंतिम यादीची प्रसिध्दी करणे | मतदान ज्या दिनांकास घेण्यात येईल तो दिनांक,वेळ व मतदानाचे स्थळ | मतमोजणी दिनांक ,वेळ व स्थळ | मतमोजणी निकाल घोषीत करण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | सर्वसाधारण कारागीर | ०६ | दि.०५.१२.२०२५ रोजी प्रक्रीया पुर्ण | प्रक्रीया पुर्ण | दिनांक ०२.०३.२०२६ सकाळी ११.०० पासुन छाननी संपेपर्यंत (निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दिनांक ०४.०३.२०२६ सकाळी ११.वाजता (निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात व संस्थेच्या नोटीस बोर्डावर) | दिनांक ०४.०३.२०२६ ते दिनांक १८.०३.२०२६ सकाळी ११.०० वा. ते दुपारी ०३. वा. (निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दिनांक २०.०३.२०२६ सकाळी ११.०० वा. (निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दिनांक २९.०३.२०२६ वेळ सकाळी ०८.०० ते दुपारी ०४.०० वा.पर्यंत स्थळ :- नंतर कळविण्यात येईल. | दिनांक २९.०३.२० २६ वेळ दुपारी ४.१५ पासुन स्थळ :- नंतर कळविण्यात येईल | दिनांक २९.०३.२०२६ रोजी मतमोजणी नंतर लगेच. |
| २ | अनुसूचित जाती / जमाती | ०१ | | | | | | | | | |
| ३ | विमुक्त जाती / भटक्या जमाती किंवा विशेष मागास प्रवर्ग | ०१ | | | | | | | | | |
| ४ | इतर मागासवर्गीय प्रतिनिधी | ०१ | | | | | | | | | |
| ५ | महीला राखीव | ०२ | | | | | | | | | |
| | एकुण | ११ | | | | | | | | | |

वरील अनुसूचिमधील क्र.०३ ते ०८ मधील कामकाज निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयामध्ये होईल.निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयाचा पत्ता :- कार्यालय,सहायक निबंधक,सहकारी संस्था, ता.पाटोदा. पारगावं रोड ता.पाटोदा जि.बीड असा आहे. निवडणुक संबंधीत सर्व परिपत्रके ,नियम व अटी शर्ती,अनुषंगीक सुचना निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात पहावयास मिळतील.वरल अनुसूचितील स्तंभ ३ , ४ व ७ मधील कामकाज शासकीय सुटटीचे दिवस वगळुन होईल

(एस.ए.गायकवाड )
निवडणुक निर्णय अधिकारी
पाटोदा तालुका औद्योगिक बहुउदेशिय ग्रामीण सहकारी संस्था म.पाटोदा ता.पाटोदा जि.बीड

(सतीश तोटावार )
जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी
तथा जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,बीड

( अशोक गाडे )
सचिव
राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण,महाराष्ट्र राज्य,पुणे

# मराठवाडा पत्र

रविवार दि. १ मार्च २०२६ पान : ४


## बस प्रवासाच्या सवलतीसाठी एनसीएमसी कार्ड बंधनकारक

# बीडमध्ये प्रवाशांचा मोठा प्रतिसाद

**बीड ।** प्रतिनिधी

एसटी महामंडळाच्या बसेस मध्ये पूर्वी आधार कार्ड दाखवले की जेष्ठ नागरिक, दिव्यांग, महिला आणि ३५ प्रकारच्या विविध लाभार्थ्यांना एसटीच्या तिकिटात सवलत मिळायची. मात्र, आता आधार कार्ड वरील ही सवलत एक मार्च पासून बंद होणार आहे. त्या ऐवजी नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड अनिवार्य करण्यात आहे. राज्यात या कार्डसाठी नोंदणी सुरू असून बीड बस स्थानकात यासाठी प्रवाशांची झुंबड पाहायला मिळतेय. याचा लाभ घेण्यासाठी पहाटेच प्रवासी आगारात रांग लावून आहेत. बीडमध्ये उन्हाचा पारा वाढतोय अशातच मोठ्या संख्येने महिला उन्हात रांगेत आहे. त्यामुळे प्रवाशांसाठी एसटी महामंडळाने नियोजन करावे अशी मागणी प्रवाशांची आहे.




### एनसीएमसी कार्ड कोणत्या सवलतीसाठी आवश्यक

महिला,ज्येष्ठ नागरिक,अमृत ज्येष्ठ नागरिक, दृष्टिहीन,दिव्यांग (शारीरिक अपंग),विद्यार्थी,इतर सर्व सवलती, सवलत नसलेले प्रवासी यांना नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड काढावं लागेल. महिला, ज्येष्ठ नागरिक आणि अमृत ज्येष्ठ नागरिकांना आधार कार्ड जोडून एनसीएमसीसाठी अर्ज करता येईल. दृष्टिहीन,दिव्यांग (शारीरिक अपंग) यांना वैश्विक ओळखपत्र आवश्यक असेल. विद्यार्थ्यांना सरल क्रमांक, इतर सर्व सवलतीसाठी शासकीय प्रमाणपत्र तर सवलत नसलेल्या प्रवाशांना मोबाईल ओटीपी द्यावा लागेल. यानंतर त्यांना एनसीएमसी कार्ड मिळू शकेल.

## नातीसह महिला जखमी

# भरदिवसा महिलेच्या गळ्यातील दागिने लंपास



**आष्टी ।** प्रतिनिधी

तालुक्यातील केरूळ येथील एका महिलेच्या गळ्यातील १६ ग्रॅमचे मिनी गंठण अज्ञात दोन चोरट्यांनी भरदिवसा लंपास केल्याची घटना बुधवार (दि.२५)रोजी सायंकाळी ६ च्या सुमारास शेरी पुलावर घडली असून या झटापटीत महिला स्कुटीवरून पडल्याने नातीसह जखमी झाली आहे. बीड-अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावर सोनसाखळी चोरट्यांनी पुन्हा एकदा डोके वर काढले आहे असून आष्टी तालुक्यातील केरूळ येथील एक महिला आपल्या नातीला कडा येथील दवाखान्यात दाखवण्यासाठी स्कुटीवरून आली होती. उपचार घेऊन त्या गावाकडे परतत असताना, शेरी पुलावर मागून भरधाव वेगात आलेल्या दुचाकीवरील दोन अज्ञात चोरट्यांनी महिलेच्या गळ्यातील १६ ग्रॅमचे मिनी गंठण भरदिवसा लंपास केल्याची घटना बुधवार (दि.२५)रोजी सायंकाळी ६ च्या सुमारास घडली.चोरट्यांच्या या ओढाताढीत महिलेचे स्कुटीवरील नियंत्रण सुटले आणि त्या नातीसह खाली पडल्या. यात त्यांना दुखापत झाली असून अज्ञात चोरट्यांविरुद्ध आष्टी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पो.ह.भाऊसाहेब आहेर या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये

# शारदा विद्या मंदिरचे नेत्रदीपक यश

**गेवराई ।** प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाने नुकत्याच घेतलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये शारदा विद्या मंदिर गेवराईचे एकूण ३६ विद्यार्थी चांगल्या गुणांनुक्रमाने उत्तीर्ण झाले, या परीक्षेमध्ये प्रामुख्याने कु समृद्धी तोर ऋषिकेश जाधव, यशश्री जोशी, आनंद आतकरे, वेदिका लोखंडे, कृष्णा काळे, दिग्विजय कवळे, ईश्वरी फरताडे, करण खेडकर, वेदिका चांद्रे, सिद्धी हिंगे, वेदांत उबाळे, शिवराज हातमोडे, प्रतीक सूर्यवंशी, सृष्टी मुळे, कृष्णा यादव, पार्थ फलके, जानवी पोपळे, शौर्य दाभाडे, आदिती जाधव, अभिजीत पगारे, शिवम खरात, अथर्व लाड, पियुष शिंदे, माधवी काळे, तलहा चाऊस, शिवम राठोड, सायली पघळ, अभिजीत तोर, विश्वजीत राऊत, अखिलेश शेळके, आदर्श चव्हाण, वैष्णवी पोपळघट, कार्तिकी पवार, श्रावणी जगताप, प्रतिक्षा राठोड इत्यादी विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश मिळवून संस्थेचे व शाळेचे नाव उज्वल केले, सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष अमरसिंह शिवाजीराव पंडित, सचिव जयसिंह शिवाजीराव पंडित, आमदार विजयसिंह शिवाजीराव पंडित, रणवीर (काका) अमरसिंह पंडित, पृथ्वीराज जयसिंह पंडित, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी प्रमोद गोरकर, सह प्रशासकीय अधिकारी श्री काशिनाथ गोगुले, अमृत डावकर सर, विद्यालयाचे प्राचार्य मुरलीधर पवार, माजी प्राचार्य राजेंद्र जगदाळे इत्यादी मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या, या परीक्षेसाठी सर्व विद्यार्थ्यांना मोलाच मार्गदर्शन करणारे, संगणक विभागाचे प्रमुख डॉ सदानंद कुलकर्णी, श्री महेंद्र देशमुख, श्री सतीश मस्के, श्रीमती सोनाली दाभाडे मॅडम, श्रीमती संगीता पवार मॅडम यांनी पथक परिश्रम घेतले.



## गणिताच्या दुनियेत

# 'वेदांश'चा डंका!

### राज्यस्तरीय अबॅकस स्पर्धेत पटकावले सुवर्ण

**बीड ।** प्रतिनिधी

गणिताची आकडेमोड म्हणजे अनेकांसाठी डोकेदुखी असते, पण याच आकड्यांशी मैत्री करत वेदांश युवराज चव्हाण याने आपल्या बुद्धिमत्तेची चुणूक दाखवली आहे. 'जीनिअस अबॅकस अकॅडमी' तर्फे आयोजित राज्यस्तरीय ऑनलाईन अबॅकस चॅम्पियनशिप मध्ये वेदांशने उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम श्रेणीसह (ए ग्रेड) यश संपादन केले असून, त्याच्या या घवघवीत यशाबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. आजच्या धावपळीच्या युगात तंत्रज्ञानासोबतच बुद्धीचा कस लागणाऱ्या स्पर्धांचे महत्त्व वाढले आहे. या स्पर्धेत राज्यभरातून अनेक विद्यार्थी सहभागी झाले होते. मात्र, वेदांशने आपल्या एकाग्रतेच्या आणि अचूकतेच्या जोरावर लेव्हल-१ मध्ये बाजी मारली. अत्यंत कमी वेळात कठीण आकडेमोड करून त्याने परीक्षकांची मने जिंकली. वेदांशने हे यश मिळवण्यासाठी सातत्यपूर्ण सराव आणि मेहनतीची जोड दिली. त्याच्या या यशात त्याच्या मार्गदर्शकांसह पालकांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे. या यशाबद्दल मित्रपरिवार, नातेवाईक आणि शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांकडून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. आगामी काळात देखील तो अशाच प्रकारे गणिताच्या क्षेत्रात मोठी मजल मारेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.




# बारगजवाडीत मध्यरात्री चोरट्यांनी फोडले घर

**शिरूर कासार ।** प्रतिनिधी

तालुक्यातील बारगजवाडी येथील घराची भिंत फोडून अज्ञात चोरट्यांनी कपाटातील सोन्या-चांदीच्या दागिन्यांसह रोख रक्कम असा एकूण १,६८,२१० रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना रविवार (दि.२२)रोजी मध्यरात्री घडली असून अज्ञात चोरट्यांविरुद्ध शिरूर कासार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिरूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत मागील काही दिवसांपासून चोरीच्या घटनेत दिवसेंदिवस वाढ होताना दिसत असून पोलिसांच्या कामगिरीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत.शिरूर कासार तालुक्यातील बारगजवाडी येथील रहिवाशी असलेल्या द्रोपदाबाई बाळासाहेब मिसाळ (वय ७०) ह्या व त्यांचे पती जेवण करून रविवार (दि २२) रोजी रात्री १० च्या सुमारास घरासमोरील पडवीत मागच्या घराला कुलूप लावून झोपले असता मध्यरात्री त्यांच्या घराची भिंत फोडून अज्ञात चोरट्यांनी कपाटातील चार ग्रॅमचे वेलजोड अंदाजे किंमत ३३६१०,एक ग्रॅमचे हुजूर जोड अंदाजे किंमत ७६००, दोन ग्रॅमचे ४९ मणी अंदाजे किंमत १५४००,दिड ग्रॅमची बुगडी अंदाजे किंमत ११६०० व १,००,००० लाख रुपये रोख रक्कम असा एकूण १,६८,२१० रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना सोमवार (दि.२३) रोजी सकाळी ०६ च्या सुमारास मिसाळ दाम्पत्याच्या निदर्शनात आली.त्यानंतर शिरूर पोलिसांना घडलेल्या घटनेची माहिती देत अज्ञात चोरट्यांविरुद्ध शिरूर कासार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून पुढील तपास पो.अं.एस.जी.खाडे हे करत आहेत.

# श्रीक्षेत्र संस्थान नारायणगड येथे शिवजयंतीनिमित्त व्याखान

**राजुरी ।** प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मोत्सवानिमित्त श्रीक्षेत्र संस्थान नारायणगड येथे शुक्रवारी प्रा.यशवंत गोसावी यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. श्रीक्षेत्र संस्थान नारायणगड येथे गेल्या नऊ वर्षांपासून हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्मोत्सव सोहळा उत्साहात साजरा करण्यात येतो. यावर्षी शुक्रवार दि.२७/०२/२०२६ रोजी सकाळी ११ वा. श्रीक्षेत्र संस्थान नारायणगडाचे मठाधिपती प्रेममुर्ती महंत ह.भ.प.शिवाजी महाराज, ह.भ.प.संभाजी महाराज यांच्या आशिर्वादाने व संघर्षयोद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांच्या मार्गदशनाखाली आणि राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब यांचे वंशज सिंदखेडराजा येथील शिवाजीराजे जाधव यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध शिवव्याखानकार प्रा.यशवंत गोसावी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. तसेच रक्तदान शिबीर, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धेचे मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात येणार आहे. तरी श्रीक्षेत्र संस्थान नारायणगड परीसरातील शिवभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन शिवजन्मोत्सव समिती श्रीक्षेत्र संस्थान नारायणगड यांनी केले आहे.



## यशवंतराव चव्हाण तंत्रनिकेतन बीड येथे

# महिला तक्रार निवारण समितीच्या वतीने एक दिवसीय कार्यशाळा

**बीड ।** प्रतिनिधी

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, यशवंतराव चव्हाण तंत्रनिकेतन, बीड येथे महाविद्यालयातील महिला तक्रार निवारण समिती यांच्या वतीने लैंगिक छळ प्रतिबंध व तक्रार निवारण या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बापुराव गहिनीनाथराव मरलापल्ले हे उपस्थित होते. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात त्यांनी महाविद्यालयातील सुरक्षिततेबाबत सविस्तर माहिती दिली. विद्यार्थिनींच्या सुरक्षेसाठी महाविद्यालयात विविध उपाययोजना राबविण्यात येत असून विद्यार्थ्यांनी कोणतीही भीती न बाळगता तक्रार नोंदवावी, असे आवाहनही त्यांनी केले. कार्यशाळेसाठी महिला तक्रार निवारण समितीच्या बाह्य सदस्या मनिषा तोकले मॅडम उपस्थित होत्या. त्यांनी लैंगिक छळ प्रतिबंध अधिनियम २०१३, तसेच महिलांचे कायदेशीर हक्क याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी उदाहरणांच्या माध्यमातून विषय प्रभावीपणे स्पष्ट केला. सदरील कार्यक्रमासाठी श्री. अशोक तांगडे अध्यक्ष, बालकल्याण समिती.बीड हे ही उपस्थित होते.

# विज्ञानाला धर्म मानणारे सावरकर होते-डॉ.बाहेगव्हाणकर

**बीड ।** प्रतिनिधी

सशस्त्र क्रांतीची मशाल हाती घेऊन युवकांना स्वातंत्र्य कार्यासाठी प्रेरित करणारे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर हे बुद्धी प्रामाण्यवादी होते. सावरकरांनी विज्ञानाला धर्म मानले असे प्रतिपादन सावरकर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर यांनी केले. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या आत्महत्या दिनानिमित्त सावरकर महाविद्यालयामध्ये आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी सावरकर संकुलाचे कार्यवाह डॉ. अविनाश देशपांडे, सावरकर विद्यालय स्थानिक समितीचे अध्यक्ष प्रमोद कुलकर्णी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे, उपप्राचार्य डॉ. उत्तम साळवे यांची उपस्थिती होती.पुढे बोलताना डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर म्हणाले की, स्वातंत्र्यवीर सावरकरांनी कर्मकांडाला विरोध केला, जुन्या कालबाह्य रूढी,परंपरा याचा त्याग करा असा आग्रह त्यांनी धरला होता. विज्ञान हाच धर्म माना असे आवाहन त्यांनी केले. यंत्र युगाचा पुरस्कार केला. विज्ञानाचा मंत्र म्हणत क्रांतीची मशाल हाती घेऊन मदनलाल धिंग्रा, अनंत कान्हेरे यासारख्या असंख्य क्रांतिकारकांना प्रेरणा देऊन स्वातंत्र्यलढ्यात उतरवले. विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांचे विचार आचरणात आणावेत असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे यांनी केले. संकुलाचे कार्यवाह अविनाश देशपांडे यांच्या हस्ते अभिवादन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी यांची उपस्थिती होती.